शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र शासन
दरपत्रक सूचना क्र.१
डी.एल.एड.प्रथम वर्ष ऑनलाईन (Online) प्रवेश करणेसाठी संगणकीय सेवापुरविणे
सन २०२६-२७

संचालक, राज्य शैक्षणिक संशोधनव प्रशिक्षण परिषद, पुणे ३० करिता डी.एल.एड.प्रथम वर्ष प्रवेश (Online) करणेसाठी संगणकीय सेवा पुरवठा सन २०२६-२७ साठी अधिकृत संगणक एजन्सी कडून डी.एल.एड प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांचे Online अर्ज स्वीकारणे, Online शुल्क भरुन घेणे, उमेदवारांना त्यांच्या विकल्पानुसार प्रवेशपत्र देणे त्यासाठी लागणारे software तयार करणे इ.कामासाठी संगणकीय सेवा पुरविण्यासाठी दरपत्रक पद्धतीनुसार दरपत्रक मागविण्यात येत आहे.

दरपत्रक सादर करावयाच्या नमुना व संगणक एजन्सीने करावयाच्या कामाचा तपशिल (परिशिष्ट-१) सोबत संलग्न केला आहे. दरपत्रक दि.१५/१२/२०२५ ते दि.२३/१२/२०२५ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत सीलबंद पाकिटावर “डी.एल.एड प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश करणेसाठी संगणकीय सेवा पुरविणे” असे ठळक अक्षरात नमूद करून कार्यालयीन कामकाजादिवशी हस्तपोच सादर करावे. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. न्यूनतम दराच्या आधारे संस्था/पुरवठादाराची निवड करण्यात येईल.

Digitally signed by
Dipak Ambadas Mali
Date: 10-12-2025
10:46:39

दि.१५/१२/२०२५

(डॉ. दीपक माळी)
उपसंचालक (सेवापूर्व शिक्षण)
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, पुणे ३०

## परिशिष्ट -१

## संगणक एजन्सीकडून करून घ्यावयाच्या कार्याचा तपशील
## डी.एल.एड. प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया सन २०२६-२७

१. ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांचे Registration करून घेणे. विद्यार्थ्यांची फी Payment Gateway किंवा चलनाने ऑनलाईन भरून घेणे Online receipt देणे. विद्यार्थ्यांना Login ID देणे. पासवर्ड हरविल्यास पुन्हा बदलण्याची तरतूद / सुविधा उपलब्ध करून देणे. मान्यता प्राप्त अध्यापक विद्यालयांची संगणक प्रोग्रॅमव्दारे मास्टर लिस्ट तयार करणे.

२. वैधानिक व सामाजिक आरक्षणानुसार शाखानिहाय विभागस्तरीय ७०% व ३०% राज्यस्तरीय जागा वाटप करणे.

३. प्रत्येक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला (DIET) प्रमाणपत्र पडताळणीसाठी तसेच अध्यापक विद्यालयांना लॉग इन आय डी देणे

४. संचालक **राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद** यांना लॉग इन आय डी देणे व dashboard चा access देणे

५. विद्यार्थ्यांचे प्रवेशासाठीचा Online भरलेला डाटा संकलन व Processing (College Option सह) आलेल्या प्रवेशअर्जाची पडताळणी करणे.(Programmatically)

६. विद्यार्थ्यांना व छाननी केंद्रांस वेळोवेळी SMS व ईमेल द्वारा नोटीफिकेशन्स पाठविण्याची सोय प्रणालीत असणे आवश्यक आहे

७. अंतिम गुणवत्ता यादी तयार करणे.

अ) विभाग निहाय ७०%

ब) राज्य पातळीवर ३०%

क) शाखानिहाय, वैधानिक व सामाजिक आरक्षण निहाय गुणवत्ता यादी तयार करणे.

८. विद्यार्थ्यास सर्व अध्यापक विद्यालयांची नावे तसेच अध्यापक विद्यालयनिहाय allotted विद्यार्थी यादी website वर प्रदर्शित करणे

९. प्रवेशाबाबत माहिती विद्यार्थ्यास Registered E-mail वर पाठविणे.

१०. प्रवेशप्रक्रियेदरम्यान NCTE, नवी दिल्ली यांचेमार्फत अध्यापक विद्यालयाची मान्यता रद्द केल्यास/ पुनश्च मान्यता पूर्ववत केल्यास संबंधित अध्यापक विद्यालयाबाबत अनुषांगिक सर्व कार्यवाही करणे.

११. प्रवेशपात्र विद्यार्थ्यास प्रवेश पत्र देणे. (नियमावलीनुसार गुणवत्ता आधारीत प्रवेश पत्रे देणे)

१२. संबधित सर्व अभिलेखे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथून घेऊन जाणे व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेस परत करणे.

१३. सन २०२६-२७ ची डी. एल.एड प्रवेश प्रक्रिया संपल्यावरही कराराच्या एक वर्षाच्या कालावधीत परिषदेला वेळोवेळी लागणारे अहवाल, सांख्यिकीय माहिती उपलब्ध करून देणे.

१४. प्रवेश प्रक्रिया कालावधीत प्रवेश प्रक्रियेचा प्रगती अहवाल (दैनंदिन अहवाल ) परिषदेला पाठविणे.

१५. प्रथम फेरीनंतर व दुसऱ्या फेरीच्या आधी रिक्त जागांचा आढावा घेऊन पुढील नियोजन करणे.

१६. शाखानिहाय/ संवर्गनिहाय गुणांचा तक्ता काढणे.

१७. संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेशाचा एकत्रित समग्र अहवाल देणे, शेवटी झालेला प्रवेश शाखा/संवर्ग/गुण इ. माहिती देणे.

१८. प्रवेशाच्या संदर्भात आवश्यक ती सर्व माहिती वेळोवेळी वेबसाईटवर एजन्सीच्या खर्चाने प्रसारित करणे.

१९. विविध प्रकारची सांख्यिकीय माहिती देणे.

२०. प्रवेश प्रक्रिया संपल्यावर अहवालासह software चा सोर्स कोड देणे. तसेच User Manual च्या २ प्रती देणे.

२१. माहिती अधिकारांतर्गत करार कालावधीत वेळोवेळी आवश्यक असलेली माहिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेस द्यावी लागेल.

२२. या कामासाठी योग्य संगणक प्रणाली विकसित करणे. एजन्सीकडे सर्व data online ठेवण्यासाठी आवश्यक क्षमतेचे Servers उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच संपूर्ण data offline access (without internet) होणेसाठी Hard Disk व आवश्यक संगणक प्रणालीमध्ये (Programme) उपलब्ध करून देणे.